लोकमत

## शिवाजी विद्यापीठ क्षेत्रात उच्च शिक्षणाची स्थिती; मुंबई, पुण्याच्या तोडीचे शिक्षण

# जिथे सजगता, तिथेच गुणवत्ता

शासकीय, अभिमत आणि आता खासगी विद्यापीठ अशी उच्च शिक्षणाची रचना असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये सजगता आहे, तिथेच गुणवत्ता निदर्शनास येत आहे. खासगी प्राथमिक, माध्यमिक शाळांतील चित्र आता उच्च शिक्षणामध्ये दिसत आहे.

इंग्रजी माध्यमाचे महत्त्व वाढत आहे. पात्र प्राचार्य, प्राध्यापक हे पूर्वी खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये जाण्यास तयार नसायचे. मात्र, आता या संस्थांमध्ये शासकीय महाविद्यालय, विद्यापीठांप्रमाणे वेतन मिळत असल्याने त्यांच्या या संस्थांकडे कल वाढला आहे. खासगी संस्था, अभिमत विद्यापीठे, स्वायत्त संस्था, खासगी विद्यापीठांतील पायाभूत सुविधा या आधुनिक स्वरुपातील आहेत. तेथील व्यवस्था उत्तम आहे. गुणवत्ता व आर्थिक ताकद यांच्या जोरावर या संस्था आघाडी घेत आहेत. सध्या पालक हे आपल्या पाल्याच्या भवितव्यासाठी उत्तम शिक्षण मिळावे यासाठी जादा आर्थिक भार सोसण्यासदेखील तयार आहेत. उच्च शिक्षणातून कौशल्य मिळतील का? याचा विचार पालक, विद्यार्थी करीत आहेत.



पारंपरिक, औपचारिक शिक्षणामध्ये रोजगार मिळविण्याची पात्रता मिळत नसल्याचे वास्तव आहे. सामाजिक शास्त्रे, भाषा विद्याशाखांमध्ये कौशल्ये कमी आहेत. मात्र, स्वत:च्या गुणवत्तेमुळे यातील विद्यार्थ्यांनी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. विज्ञान शाखेतील भौतिकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, संख्याशास्त्र आदी विद्याशाखामध्ये कौशल्ये अधिक असली, तरी त्यांची क्षमता वाढविण्याची गरज आहे. अभियांत्रिकी, विज्ञान शाखेशी संबंधित अभ्यासक्रम, महाविद्यालयांची संख्या गेल्या सात वर्षांत दीडपट वाढली आहे. प्राध्यापकांची संख्या वाढली. पण, यात खरोखरच गुणवत्तापूर्ण कितीजण आहेत हा संशोधनाचा विषय आहे. या प्राध्यापकांच्या कामकाजाचे मूल्यमापन पूर्वीसारखे समाज, विद्यार्थी यांच्यामार्फत होत नसल्याचे वास्तव आहे. मुंबई, पुणे, नागपूरच्या तोडीस तोड उच्च शिक्षण हे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात मिळते. इंग्रजी भाषेचा वापर, सादरीकरण करण्यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी कमी पडतो. मात्र, अभ्यासातील आशयामध्ये (कंटेट) ते आघाडीवर आहेत. उच्च शिक्षण, प्रत्यक्ष व्यवहारातील इंग्रजीच्या वापरावर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. अर्थशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांत गणित, संख्याशास्त्र यांचा संयुक्तीक वापर मोठ्या प्रमाणात करण्याची गरज आहे.

ज्या महाविद्यालयाचे व्यवस्थापन, प्राचार्य सजग आहेत, तिथेच गुणवत्ता वाढ होत आहे. परंपरेने मोठी असलेल्या महाविद्यालयांमध्ये सजगता नसल्याने ती मागे पडत आहेत. नवीन अभ्यासक्रमांद्वारे विविधीकरण येत आहे. चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम स्वागतार्ह आहे.

### शिवाजी विद्यापीठ एकूण विद्यार्थीसंख्या (सन २०१६-१७)

| विद्याशाखा | संलग्नित महाविद्यालये | | विद्यापीठातील विभाग | |
|---|---|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
| कला, समाजशास्त्र | ३६५०५ | ३२८५४ | ९९५ | ६०४ |
| वाणिज्य | १९४०३ | २७८३३ | ८७ | ६० |
| विज्ञान | २१५४४ | २३९०४ | ८९० | १४५२ |
| अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | ३३१८६ | १५९८८ | १०८० | ६३७ |
| संगणकशास्त्र | २५३९ | ३७१० | १६१ | ३३६ |
| व्यवस्थापन | २७३२ | २३५२ | ७६ | ९२ |
| फार्मसी | २३७६ | २९५२ | - | - |
| विधि (लॉ) | १२७४ | १२८२ | १८३ | ८६ |
| शिक्षणशास्त्र | १०९५ | २४३४ | १३४ | २७२ |
| इतर अभ्यासक्रम | ६३४ | ६५८ | ३३७ | १६० |



### शिक्षणस्तरनिहाय विद्यार्थिसंख्या

| शिक्षण | विद्यार्थी | विद्यार्थिनी |
|---|---|---|
| पीएच. डी. | ४२९ | २७८ |
| एम. फिल. | ९० | ८७ |
| पदव्युत्तर | १५३८ | २२३८ |
| अंडर ग्रॅज्युएट (पदवीपूर्व) | ११२१ | ६५१ |
| पीजी डिप्लोमा | ३९७ | ८५ |
| पदविका | १०३ | ६३ |
| प्रमाणपत्र अभ्यासक्रम | २६५ | २९७ |

### 'नॅक'ला सामोरे गेलेली महाविद्यालये

| 161 | 113 | 8 |
|---|---|---|
| पहिली फेरी | दुसरी फेरी | तिसरी फेरी |

### शाखानिहाय महाविद्यालय




173
कला, वाणिज्य व विज्ञान



43
शिक्षण शास्त्र



7
विधी (लॉ)



36
अभियांत्रिकी



6
आर्किटेक्चर



17
फार्मसी

रेकग्नाइज्ड इन्स्टिट्यूट : १

### प्राध्यापक नियुक्तीचा 'नाजूक' प्रश्न

महाविद्यालयांतील प्राध्यापक नियुक्ती हा नाजूक प्रश्न आहे. आर्थिक तडजोडी करुन नोकरीस लागलेल्या व्यक्तींची गुणवत्ता आणि शिक्षणाबाबतची बांधीलकी अनेकदा राहात नाही. हे चित्र बदलण्यासाठी नियुक्तीची प्रक्रिया बदलली पाहिजे. शिक्षकांची किमान पात्रता निश्चित करावी. या पात्रतेनुसार नियुक्तीसाठी संस्थाचालकांना मोकळीक द्यावी.

### असे आहे दुखणे, उणिवा

- पात्र प्राचार्य, गुणवत्तापूर्ण प्राध्यापक मिळणे कठीण झाले आहे.
- नव्या तरतुदीनुसार प्राचार्यपदाचा पाच वर्षांचा कालावधी
- शारीरिक शिक्षण व क्रीडा याबाबत प्राधान्य नाही. महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर विशेष धोरण नाही.
- कौशल्यपूर्ण, रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे प्रमाण अद्यापही कमी
- प्राध्यापक नियुक्तीबाबतचे शासनाचे सध्याचे धोरण

### मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढले



मुलींच्या उच्च शिक्षणातील प्रमाण वाढले आहे. काही अभ्यासक्रमांना ६०-४०, तर अनेक अभ्यासक्रमांसाठी ५०-५० टक्के असे प्रमाण आहे. महिला प्राध्यापकांची संख्या वाढत आहे. एकूणच पाहता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील हे चित्र चांगले आहे.

### दूरशिक्षण केंद्रातील सहा वर्षांतील विद्यार्थी संख्या

| वर्ष | विद्यार्थिसंख्या (लाखांत) |
|---|---|
| २०११-१२ | २१०४५२ |
| २०१२-१३ | २५२४५४ |
| २०१३-१४ | २६२३९४ |
| २०१४-१५ | २६३८०५ |
| २०१५-१६ | २७०३२८ |
| २०१६-१७ | २६९६१२ |



**स्वायत्त महाविद्यालये** : छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस, मॅनेजमेंट ॲन्ड रिसर्च, कोल्हापूर, टेक्सस्टाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट,

# पारंपरिक अभ्यासक्रमांचे विद्यापीठात सदृढीकरण

## नवी पावले; सात नव्या अभ्यासक्रमांची सुरुवात

गेल्या दहा वर्षांत उच्च शिक्षणातील पारंपरिक अभ्यासक्रमांच्या सदृढीकरणाच्या दिशेने शिवाजी विद्यापीठाची पावले पडली आहेत. आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय पातळीवर ज्या अभ्यासक्रमांना मागणी आहे. त्याची सुरुवात विद्यापीठाने केली आहे. त्यामध्ये बायोटेक्नॉलॉजी, फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी आदींचा समावेश आहे. उपयोजित अभ्यासक्रमांची सुरुवात करुन त्यांना पायाभूत अभ्यासक्रमांची जोड दिली आहे. त्यात एम. टेक. इन रुरल टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ रुरल स्टडी, मायक्रो बायोलॉजी, पर्यावरणशास्त्र यांचा समावेश आहे. गेल्या पाच वर्षांत विद्यापीठात एम. ए. वुमेन्स स्टडीज, एम. ए. हिंदी प्रौद्योगिकी, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट (एमएसडब्ल्यू., एमआरएस., एमसीए., एमबीए., एम. टेक. रुरल), एम. एस्सी. ॲप्लाईड स्टॅटॅस्टिक्स्, एम. एस्सी फार्मास्युटिकल मायक्रो बायॉलॉजी, एम. एस्सी. इन्व्हरमेंट बायो टेक्नॉलॉजी, बी.एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी हे अभ्यासक्रम सुरु केले आहेत. बदलते तंत्रज्ञान आणि समाजातील गरज ओळखून अभ्यासक्रम सुरु करण्याच्या दिशेने उच्चशिक्षणामध्ये विद्यापीठाची पावले पडत आहेत शिवाय नव्या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विविध विद्याशाखांमधील मूलभूत संशोधन, अध्ययन-अध्यापनात पुढे जाण्याची वाटचाल सुरु आहे. गेल्या दहा वर्षांत विद्यापीठ अनुदान आयोग, डीएसटी, पर्स-सॅप आदी योजनांतून विद्यापीठातील विविध विभागांना संशोधनासाठी मिळालेल्या निधीतून उच्च शिक्षणातून गुणात्मक वाढ दिसून येते. विद्यापीठातील शंभराहून अधिक विद्यार्थी हे अमेरिका, दक्षिणा कोरिया, युरोपियन देश, आदी ठिकाणी नोकरी आणि संशोधन क्षेत्रांत कार्यरत आहेत.

**संतोष मिठारी**

### कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाच्या दिशेने वाटचाल

संशोधन व विकास हा धागा घेऊन उच्चशिक्षणात विद्यापीठाची कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वाटचाल सुरु आहे. तंत्रज्ञानातील अद्ययावत शिक्षण देणारा विभाग कार्यान्वित केला आहे. फार्मास्युटिकल, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान हे अभ्यासक्रम सुरु करण्याचा विचार आहे. नवीन विद्यापीठ कायद्यानुसार बृहत आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यात समाजाची गरज लक्षात घेऊन कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाची सुरुवात केली जाईल. हटके असलेल्या अभ्यासक्रमांचा यात समावेश करण्यावर भर राहील. विद्यार्थ्यांना आवडणारे, रोजगारनिर्मिती करणारे अभ्यासक्रम सुरु करण्याच्या दिशेने विद्यापीठ वाटचाल करीत आहे.

**डॉ. डी. टी. शिर्के**



प्रभारी प्र-कुलगुरु

### विद्यापीठात २१ स्वावलंबी अभ्यासक्रम

विद्यापीठात वृत्तपत्र व संवादशास्त्र (एमजेसी), ग्रंथालय व माहितीशास्त्र (एम. लिब.), संगीतशास्त्र एमपीए, एम. ए. मास कम्युनिकेशन, एलएलएम., वाणिज्य व व्यवस्थापन (एमसीए), एमबीए, गणित एमएस्सी. टेक., गणित, एम. एस्सी ॲप्लाईड स्टॅटॅस्टिक्स, मायक्रो बायॉलॉजी, फार्मास्युटिकल मायक्रो बायॉलॉजी, इंडस्ट्रीयल केमिस्ट्री, इन्व्हरमेंट बायो टेक्नॉलॉजी, ॲप्लाईड केमिस्ट्री, बायो टेक्नॉलॉजी, ॲग्रो केमिकल ॲण्ड पेस्ट मॅनेजमेंट, कॉम्प्युटर सायन्स, एमसीए, एम. एस्सी. पर्यावरणशास्त्र, बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स्, एम.एस्सी फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, बी. टेक, एम. टेक हे स्वावलंबी अभ्यासक्रम (सेल्फ स्पोर्टिंग) सुरु आहेत. त्यातील बहुतांश अभ्यासक्रम ३० वर्षांपासून सुरु आहेत.